www.rajdand.com
पुणे, बुधवार
22.02.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । फाल्गुन शु.३
/rajdandlive
Declaration No. : SDM/SR/07/2023

मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे

मोदी है तो मुमकीन है! सेमीकंडक्टर प्लांट गुजरातमध्ये होणार

पान ४ वर..



महाविकास आघाडी तुमच्या पाठीशी

शरद पवारांनी उद्धव ठाकरे यांना दिला दिलासा

मुंबई : प्रतिनिधी

उद्धव ठाकरे गटाकडून शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाणाचा निवडणूक चिन्ह गेल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी दूरध्वनीवर चर्चा करून उद्धव ठाकरे यांना दिलासा दिला. या आव्हानात्मक काळात महाविकास आघाडी तुमच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही पवार यांनी ठाकरे यांना दिली.

निवडणूक आयोगाचा निर्णय मान्य करावा, असा सल्ला पवार यांनी यापूर्वीच ठाकरे यांना दिला आहे. निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात उद्धव ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेबाबतही ठाकरे आणि पवार यांच्यात चर्चा झाली.

शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्ह या वादात आपण प्रत्यक्ष सहभागी होणार नसल्याचे पवार यांनी स्पष्ट केले आहे.

भररस्त्यात कुत्र्यांनी मुलाचे लचके तोडले

हैदराबादेतील धक्कादायक घटना

हैदराबाद : प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यांपासून देशात कुत्र्यांची दहशत वाढतच चालली आहे. अशीच धक्कादायक घटना हैदराबादमध्ये घडली आहे.

हैदराबादमध्ये तीन भटक्या कुत्र्यांनी एका चार वर्षांच्या मुलावर हल्ला केला. भररस्त्यात कुत्र्यांनी या मुलाचे लचके तोडले, रस्त्यावर मुलाला फरफटत नेले. मुलाच्या रडण्याचा आवाज येताच, त्याचे वडील धावत आले आणि कुत्र्यांच्या हल्ल्यापासून मुलाला दूर नेले. जखमी झालेल्या मुलाला तात्काळ रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्याचा मृत्यू झाला होता.

कॅप्टन सौरभ औटी यांच्यावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार

- दोन दिवसांपूर्वी लेह-लडाख येथे आले अपघाती वीर मरण

कॅप्टन सौरभ औटी यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करताना लष्करी अधिकारी.

शेवगाव : प्रतिनिधी

कर्तव्य बजावत असताना जम्मू काश्मिरमधील लेह-लडाख भागात राळेगणसिध्दीचे सुपुत्र सौरभ भागुजी औटी (वय २६) यांना अपघाती वीर मरण आले. त्यांचे पार्थिव रविवारी दुपारी पुणे येथे आणण्यात आल्यानंतर सोमवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास राळेगणसिध्दी येथील स्मशानभुमीत त्यांच्यावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

चार वर्षापूर्वी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधीनी एनडीए मध्ये प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर यशस्वी त्यांची भारताच्या लष्कारामध्ये कॅप्टन पदावर नियुक्ती करण्यात आली होती. दोन दिवसांपूर्वी लेह-लडाख भागात ते कर्तव्यावर असताना त्यांचे अपघाती निधन झाले. त्यांचे पार्थिव जम्मू काश्मीर येथून लष्काराच्या खास विमानाने रविवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास पुणे विमानतळावर आणण्यात आले. सोमवारी सकाळी दहा वाजता त्यांचे पार्थिव घेउन लष्करी अधिकारी तसेच सैनिक राळेगणसिध्दीत पोहचले. राळेगणसिध्दीमध्ये फुलांनी सजवलेल्या वाहनातून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली. साडेदहा वाजण्याच्या सुमारास राळेगणसिध्दी येथील स्मशानभुमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

दरम्यान, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, खा. डॉ. सुजय विखे यांच्यासह सैन्यदलाच्या अधिकाऱ्यांनी पुष्पचक्र अर्पण करून औटी यांना अभिवादन केले. अंत्यविधीस लष्करी अधिकारी, सैनिक तसेच तालुक्यातील आजी माजी सैनिक, ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. राळेगणसिध्दी येथील शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक नानाभाऊ औटी यांचे नातू तर नवी मुंबईतील रबाळे पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक भागुजी औटी यांचे ते चिरंजीव होत.

जावेद अख्तर यांनी उपटले पाकिस्तानचे कान

दहशतवादी हल्ल्यांवरून पाकिस्तानात जाऊन सुनावले खडे बोल



लाहोर : वृत्तसंस्था

ज्येष्ठ कवी आणि गीतकार जावेद अख्तर यांनी फैज महोत्सवाच्या निमित्ताने पाकिस्तानात हजेरी लावून दहशतवादाला पाठीशी घालण्याच्या पाक कारवायांवरून पाकिस्तानच्या सत्ताधाऱ्यांचे कान उपटले.

आम्ही मुंबईचे लोक आहोत. आमच्या शहरावर हल्ला करणारे दहशतवादी नॉर्वेमधून आले नव्हते किंवा स्पेन मधून आले नव्हते. ते पाकिस्तानातूनच आले होते. त्यांच्यापैकी काहीजण अजूनही पाकिस्तानच्या भूमीत खुलेआम फिरताना दिसून येतात, अशी टीका जावेद अख्तर यांनी केली.

पाकिस्तानातील कलावंतांवर भारतीयांनी प्रेम केले आहे. नुसरत फतेह अली खान, गुलाम अली यासारख्या कलावंतांचे भारतात अनेकदा कार्यक्रम झाले. मात्र, संपूर्ण जगभरात आदराचे स्थान मिळालेल्या लता मंगेशकर यांचा एक तरी कार्यक्रम पाकिस्तानात झाला का असा खडा सवाल अख्तर यांनी यावेळी केला. अख्तर यांच्या स्पष्टोक्तीला उपस्थित पाकिस्तानी नागरिकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले.

शबाना आजमी आणि तुमच्या मध्ये प्रेम आहे की दोस्ती असा सवाल त्यांना करण्यात आला. त्यावेळी ते म्हणाले की ज्या प्रेमात दोस्ती नाही ते प्रेम खरे प्रेमच नाही. आमच्यामध्ये इतकी गहिरी दोस्ती आहे की लग्नामुळे ही त्यात काही फरक पडला नाही.

शिवसेनेला संपवण्यासाठी २ हजार कोटींचे पॅकेज

संजय राऊत यांचा आरोप

मुंबई : प्रतिनिधी

शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाणाचे निवडणूक चिन्ह शिंदे गटाला देण्याचा निर्णय सत्ता आणि पैशाच्या जोरावर घेण्यात आला आहे. शिवसेना संपविण्यासाठी तब्बल दोन हजार कोटी रुपयांचे पॅकेज मागील सहा महिन्यात वापरण्यात आले आहे, असा आरोप उद्धव ठाकरे गटाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी केला.

निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात उद्धव ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे. मागील काही काळापासून वधस्तंभाकडे निघालेली लोकशाही न्यायालयानेही पाहिली आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने सत्ता आणि पैशाच्या जोरावर दिलेला चुकीचा निर्णय बदलण्यासाठी सर्वोच्च न्यायालय हा शेवटचा आशेचा किरण आहे, असेही राऊत म्हणाले.

बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबई आणि मराठी माणसांसाठी स्थापन केलेली शिवसेना कोणीही संपवू शकत नाही. निवडणूक आयोगाचा निर्णय आल्यानंतर पक्षाची कार्यालय तुम्ही ताब्यात घ्याल. मात्र तळागाळातला शिवसैनिक आणि शिवसेनेच्या हितचिंतक नागरिकांच्या मनात निर्माण झालेल्या राग तुम्ही कसा शांत करणार, असा सवालही राऊत यांनी केला. खरी शिवसेना टिकवून ठेवण्यासाठी सर्वसामान्य नागरिकच रस्त्यावर येऊन संघर्ष करील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

भाजपकडून वसूल करा मताला पन्नास हजार रुपये

'वंचित'चे नेते प्रकाश आंबेडकर यांचा उपरोधिक टोला

वाशीम : प्रतिनिधी

भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना शिंदे गट पैशाच्या जोरावर राजकारण करीत आहेत. मते विकत घेण्याची भाषा करीत आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतीने ठराव करून भाजपकडून प्रत्येक मताला पन्नास हजार रुपये वसूल करावे, असा उपरोधिक सल्ला वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दिला आहे.

येथे आयोजित करण्यात आलेल्या धम्म परिषदेच्या वेळी बोलताना आंबेडकर यांनी केंद्रातील भाजप सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि राज्यातील महायुतीच्या सरकारवर कठोर शब्दात हल्ला चढविला.

मोदी आणि शहा यांच्या चेहऱ्यावर शिवसेना संपविल्याचा असुरी आनंद स्पष्टपणे दिसून येत आहे. काँग्रेस सत्तेत असताना राजकारणात दिसणारी दया माया आजकाल बघायला मिळत नाही. मोदी आणि क्रूरपणे आपल्या विरोधकांना संपवीत आहेत, अशी टीका आंबेडकर यांनी केली.

वंचितला संपवण्याचाही भाजपचा डाव आहे. मात्र, त्यांनी आमच्या नादी लागण्याची चूक करू नये. आम्हाला संपविण्याची भाषा करणारे कित्येक जण आले आणि गेले. आम्ही मात्र आहोत तिथेच आहोत, अशा शब्दात आंबेडकर यांनी भाजपाला सुनावले.

ठाकरे गटावरचे संकट राष्ट्रवादीच्या पथ्यावर

संघटना विस्ताराचे प्रयत्न जोमाने सुरू

मुंबई : प्रतिनिधी

शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह गेल्यानंतर उद्धव ठाकरे गटावर आलेले संकट राष्ट्रवादी काँग्रेसच्या पथ्यावर पडणार आहे. शिवसेनेतील गोंधळाच्या पार्श्वभूमीवर विशेषतः नवमतदारांना कृष्ट करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने कंबर कसली आहे. या पुढील काळात महाविकास आघाडीमधील सर्वात मोठ्या पक्षाचा मान राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाला आहे.

शिवसेनेत एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर महाविकास आघाडीला सत्तेतून बाहेर पडणे भाग पडले. फुटीनंतर आमदार संख्या घटल्यामुळे सत्तेवरून पायउतार होताच विरोधी पक्षनेतेपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे गेले. आता पक्षाचे नाव आणि चिन्ह ठाकरे गटाला गमवावे लागल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने संघटना विस्ताराच्या दृष्टीने पावले टाकायला सुरुवात केली आहे.

पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी विशेषतः तरुण वर्गाला पक्षासाठी काही वेळ देण्याचे आवाहन केले आहे. युवा नेते रोहित पवार हे देखील नवमतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. पक्षप्रमुख शरद पवार यांनीही महाराष्ट्राचा दौरा करून पक्ष संघटनेत नवा जोश निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

भारताच्या टेनिस सम्राज्ञीची अखेर...

नवी दिल्ली : भारताची टेनिस सम्राज्ञी अशी बिरुदावली सानिया मिर्झाला मिळाली होती. सानियाच्या आयुष्यात बरीच वादळं आली, पण तिने भारताला टेनिसमध्ये एका नव्या उंचीवर नेले, हे कोणीही अमान्य करणार नाही. पण आज या भारताच्या टेनिस सम्राज्ञीची अखेर झाली. कारण सानिया आज आपला अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना खेळली. त्यामुळे सानिया आता यापुढे मात्र भारताचे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधीत्व करताना दिसणार नाही.

भारतीय टेनिस स्टार सानिया मिर्झा मंगळवारी डब्ल्यूटीए दुबई ड्यूटी फ्री चॅम्पियनशिपमध्ये आपला अखेरचा सामना खेळली. यावेळी सानिया पहिल्या फेरीत अमेरिकन जोडीदार मॅडिसन कीजबरोबर मैदानात उतरली होती. सानियापुढे या सामन्यात रशियाच्या वेरोनिका कुडरमेटोवा आणि ल्युडमिला सॅमसोनोव्हा यांचे आव्हान होते. या सामन्यात सानिया मिर्झा जोडीचा पराभव झाला.

साताऱ्यात मटका बुकी समीर कच्छी याच्या जुगार अड्ड्यावर धाड

जुगार खेळताना २० जणांना अटक; १६ लाख २६ हजार ७० रुपयांचा मुद्देमाल जप्त

सातारा : प्रतिनिधी

सातारा जिल्ह्यातील सर्वात मोठा बुकी सलीम शेख उर्फ समीर कच्छी याच्या काळे वस्ती, सैदापूर येथील जुगार अड्ड्यावर सातारा पोलिसांनी धाड मारली. या धाडीमध्ये एकूण २० जणांना अटक करण्यात आली असून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा १६ लाख २६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सातारा जिल्ह्यातील सर्वात मोठा मटका बुकिंग याचा आर्थिक कणा मोडणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांच्या सूचनेनुसार उपनिरीक्षक विश्वास शिंगाडे यांच्या नेतृत्वाखाली दोन पथकाने स्वतंत्र कारवाई करून १९ जणांना अटक केली. शमीम उर्फ समीर सलीम शेख, वय ४२ राहणार काळे वस्ती, सैदापूर, धनंजय संपतराव कदम, वय ५५ राहणार शनिवार पेठ, सातारा, अश्विन विनायक माने, वय ४५ राहणार शेंद्रे, तालुका सातारा, नासिर हुसेन दिलावर शेख, वय ४० राहणार बुधवार पेठ, सातारा, सलीम कादिर खान, वय ३५ राहणार शनिवार पेठ, शकील कादिर सय्यद वय ५१ राहणार शनिवार पेठ, सातारा, विष्णू काशिनाथ सोनटक्के, राहणार कोरुची माळ बाग, इचलकरंजी, हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर, राजेश संपत कदम, राहणार करंजे, सातारा, विकास राजू चव्हाण, वय ३० राहणार शनिवार पेठ, सातारा, संतोष रामचंद्र माने, राहणार कोंडवे, तालुका जिल्हा सातारा, अक्षय ज्योतीराम सोनवणे वय २१ राहणार मुजावर कॉलनी, कराड, गजानन चंद्रकांत इरकल, वय ५१, राहणार शुक्रवार पेठ, सातारा, किशोर दिलीप साळुंखे, राहणार माळवाडी, तालुका जिल्हा सातारा, असद्राही सय्यद, जगदीश्वर कॉलनी सैदापूर, सातारा वय ३८ राहणार शनिवार पेठ, सातारा, साहिल शमी उर्फ समीर शेख, वय १९ राहणार काळे वस्ती सैदापूर, संतोष मोहन गुरव, राहणार काशीळ, प्रकाश तानाजी बोभाटे, राहणार मुळीकवाडी, तालुका जिल्हा सातारा, श्रीकांत लक्ष्मण पाटील, वय ६५ राहणार पाटकळ, तालुका जिल्हा सातारा, अमर गणेश पवार, वय २० राहणार गंगासागर कॉलनी, मोळाचा ओढा, सातारा अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत

पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की काळे वस्ती सैदापूर येथे शमीम शेख यांच्या राहत्या घरात कल्याण मेन मिलन राजधानी टाईम नावाचा जुगार अड्डा चालवला जात आहे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष पवार पोलीस उपनिरीक्षक विश्वास शिंगाडे यांनी दोन स्वतंत्र पथकाद्वारे जाऊन कारवाई केली यामध्ये त्यांनी जो करावा छापा टाकला असता सलीम शेख यांच्या सह त्याचे १९ साथीदार जुगार चालवीत असल्याचे दिसून आले त्यांच्या कब्जातून १६ लाख २६ हजार ७० रुपये किमतीचे जुगार साहित्य व रक्कम जप्त करण्यात आली सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश गरजे वसंत जाधव उत्तम दबडे आतिश घाडगे संतोष पवार संतोष सपकाळ संजय शिर्के विजय कांबळे शरद बेबले शिवाजी भिसे रोहित निकम विशाल पवार प्रवीण पवार पृथ्वीराज जाधव केतन शिंदे धीरज महाडिक मोहसीन मोमीन मयूर देशमुख मोना निकम राधा जगताप गिरीश रेड्डी नार्नवर यांनी या कारवाईत भाग घेतला होता.

चंदन लाकडाच्या अवैध वाहतुकीवर वन विभागाची मोठी कारवाई; सुमारे ३० लाखांचा मुद्देमाल जप्त

चंदन तस्करीचे लोन पोहोचले पंढरपूर तालुक्यातील 'खर्डी' गावात

पंढरपूर : प्रतिनिधी

मंद्रुप ते कंदलगाव रस्त्यावर चंदन लाकडाची अवैध वाहतुक होत असल्याची माहिती वनविभागास मिळाली होती. त्याअनुषंगाने घटनास्थळी जावून तात्काळ पाहणी केली असता विना नंबरप्लेट वाहनाद्वारे चंदन लाकूड वाहतुक करीत असल्याचे आढळून आले. यामध्ये २० लाख रुपये किंमतीचे चंदन व एक नवीन बोलेरो पिकअप वाहन असा एकूण ३० लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल वनविभाग जप्त केला असल्याची माहिती वन परिक्षेत्र अधिकारी दिपक खलाणे यांनी दिली.

मंद्रुप ते कंदलगाव रस्त्यावर चंदन लाकडाची अवैध वाहतुक करताना आरोपी हिराप्पा परशुराम भोसले, परशुराम हुबळी भोसले रा. दोघे घाडगेवस्ती मु.पो. खर्डी ता. पंढरपूर जि. सोलापूर, रमेश चन्नप्पा भोसले रा. मंगळवार पेठ, परीट गल्ली, मिरज ता. मिरज जि. सांगली सद्या रा. घाडगेवस्ती मु.पो. खर्डी ता. पंढरपूर जि. सोलापूर यांना ताब्यात घेतले असून सदर आरोपीनी भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४१, ४२ व ५२ अन्वये तसेच महाराष्ट्र वननियमावली २०१४ चे कलम ३७,४१,४७ व ५५ चे उल्लंघन केलेले आहे.

सदर आरोपीवर वन गुन्हा नोंदविला असून पुढील तपास वनपाल शशिकांत एकनाथ सावंत करीत आहेत. सदर कारवाई सोलापूर वनविभागाचे उपवनसंरक्षक धैर्यशिल पाटील व सहा. वनसंरक्षक (रोहयो) लक्ष्मण आवारे यांचे मार्गदर्शनाखाली केली असून त्यामध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी दिपक पं. खलाणे,वनपाल शशिकांत ए. सावंत, शंकर भि. कुताटे वनरक्षक, तुकाराम म. बादणे, अनिता सि. शिंदे, गंगाधर कणबस, वाहनचालक कृष्णा निरवणे, आनंद भडकवाड व नितीन चराटे यांचे पथकाने कारवाई केली.

नऊ हजार वह्या व तीन हजार रुपये भेट देवून

शिवतेजसिंह मोहिते पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

अकलूज : प्रतिनिधी

माळशिरस तालुक्यासह जिल्हाभरातून आलेल्या कार्यकर्त्यांकडून नऊ हजार वही व तीन हजार रोपे भेट देत अकलूजचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. हार फुले या खर्चाला फाटा देत असंख्य कार्यकर्त्यांनी शालेय साहित्य आणून तसेच विविध सामाजिक उपक्रम राबवून शिवबाबांचा वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा केला.

शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सकाळ पासूनच त्यांच्या निवासस्थानी शुभेच्छा देण्यासाठी वर्दळ पाहायला मिळाली. सकाळी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या समाधीचे व श्रीक्षेत्र आनंदी गणेश येथील कै. उदयसिंह मोहिते पाटील यांच्या शक्तीस्थलाचे दर्शन घेऊन आईसाहेब डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी पत्नी सौ.देवन्या यांनी त्यांचे औक्षण केले.

वाढदिवसानिमित्त माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, आ.रणजितसिंह मोहिते पाटील, धैर्यशील मोहिते पाटील, अर्जुनसिंह मोहिते पाटील, कीर्तीध्वजसिंह मोहिते पाटील यांच्यासह माळशिरस तालुका व सोलापूर जिल्ह्यातील विविध संस्थेचे पदाधिकारी, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच शासकीय अधिकारी यांनी शिवतेजसिंह यांना प्रत्यक्ष भेटून, दूरध्वनीवरून तसेच सोशल मिडियाच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या.

अनावश्यक खर्चाला फाटा देऊन हार फुले न आणता शालेय साहित्य आणावे असे आवाहन शिवकीर्ती युवा मंच च्या माध्यमातून केल्यानंतर या आवाहनाला उदंड प्रतिसाद लाभला अनेक जणांनी वह्या, पेन, रोपे अशा वस्तू आणत आपल्या नेत्याचा वाढदिवस साजरा केला.

क्रेनने आणलेला हार ठरला आकर्षण

महाळुंग येथील नगरसेवक सोमनाथ मुंडफणे, तानाजी भगत, विपीन सूर्यवंशी, बबलू भगत व श्रीपुर येथील सागर यादव, बजरंग भोसले यांनी आणलेल्या सुमारे दोन हजार किलो वजनाचा पुष्पहार आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. हालगीच्या तालावर व फटाक्यांच्या आतिषबाजी मध्ये शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी केक कापून वाढदिवस साजरा केला.

पंढरपूर तालुक्यात मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी

पंढरपूर : प्रतिनिधी

पंढरपूर तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये घराघरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे व फोटोचे पूजन करण्यात आले चौकात चौकात आणि घरावरती भगवे झेंडे लावून रस्त्यावरील भगव्या लाईटींग मुळे रस्तेही शिवमय झाले असून संपूर्ण गाव भगवे झाले असून गावात शिवजयंती साजरी होताना दिसत आहे.



कासेगाव येथील छत्रपती शिवाजी चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन कासेगाव ग्रामपंचायतचे उपसरपंच संग्राम सिंह देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संग्राम देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल गावातील नागरिकांना तसेच तरुण युवकांना महाराजांचा इतिहास सांगितला. 'शिवाजी' ह्या नावात काय जादू आहे... अजूनही या मातीत जन्मलेल्या पोराला सांगावं लागत नाही. या नावात असलेली पराक्रमाची अन् असामान्य गोष्ट सिद्ध करून दाखवण्याची धमक अजूनही नीतीने कमी केली नाही. राजांचं राजेपण हे ठराविक कालखंडापुरतं नव्हतं ते आजही अबाधित आहे अन् येणाऱ्या विज्ञानाच्या युगातही राहील. त्यांचा जीवनातील प्रत्येक प्रसंग काहीतरी नविन आणि जीवनाला कलाटणी देणारा आहे. म्हणून आजही महाराष्ट्रातीलच नाही तर जगभरातून त्यांचे अनुयायी आणि शिवप्रेमी रायगडावर आजही मुजऱ्याला गर्दी करतात. या तीन अक्षरांभोवती घुटमळून बऱ्याच इतिहासकारांच्या लेखनीतील शाई संपली. पण, मराठ्यांचा बलिदानाचा अन पराक्रमाचा शेवट त्यांना सापडेना. म्हणूनच जगभरात त्यांचा गनिमीकावा आजही पाठ्यपुस्तकांमध्ये अभ्यासला जातो. मला वाटत नाही की, जगभरातील हे कोणा राजाच्या वाट्याला आलं असेल. 'शिवाजी' ही अक्षरं जर उलटी वाचलीत तर 'जिवाशी' हा शब्द होतो. जो राजा आयुष्यभर गोरगरिब रयतेसाठी जिवानिशी लढला तो 'शिवाजी'. अशा रयतेच्या राजाला माझा तीन हात मुजरा आणि त्यांना घडवणाऱ्या माऊलीस लाख लाख दंडवत.... असे म्हणत महाराजांचा इतिहास सांगितला.

यावेळी कासेगाव ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य तसेच सोबत तरुण वर्ग व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भिवराबाई सावंत पॉलिटेक्निकला 'एनबीएचे' मानांकन

पुणे : प्रतिनिधी

नऱ्हे येथील टिएसएसएम संकुलातील भिवराबाई सावंत कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड रिसर्च पॉलिटेक्निकच्या सर्वच्या सर्व चारही विभागांना नॅशनल बोर्ड ऑफ एक्रीडेशन (एनबीए) समितीकडून पुढील तीन वर्षासाठी मानांकन प्राप्त झाले आहे. अभियांत्रिकी क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर एनबीए मानांकनाला फार महत्व असून पॉलिटेक्निकमधील मेकॅनिकल, कॉम्पुटर, इलेक्ट्रिकल व सिव्हिल या सर्व शाखांना मानांकन मिळाले आहे. एकाचवेळी महाविद्यालयातील चारही विभागांना पुन्हा मानांकन मिळवून सावंत पॉलिटेक्निकची गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे, अशी माहिती नऱ्हे संकुल संचालक व जेएसपीएमचे विश्वस्त ऋषीराज सावंत यांनी दिली.

एनबीए ही संस्था राष्ट्रीय स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांना मानांकन देण्याचे काम करते. समितीने नोव्हेंबर महिन्यात सावंत पॉलिटेक्निकची शिक्षण प्रणाली,सर्व सुविधा,प्रत्येक विभागातील कागदपत्रांची तपासणी केली होती.यामध्ये टिचींग-लर्निंग प्रोसेस,स्टुडंट सक्सेस रेट,इन्फ्रास्ट्रक्चर,आउट कम बेस्ड एज्युकेशन याचे मुल्यमापन केले. त्याचबरोबर वर्कशॉप,ग्रंथालय, सर्व विभागाचे लॅब आणि तेथील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली होती. एनबीए मानांकन झालेल्या विद्यालयांना शासनाच्या विविध योजनेचा लाभ तसेच विद्यार्थ्यांना परदेशामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी थेट प्रवेशाचा संधी मिळते व अशी माहिती प्राचार्य डॉ.शरद कांदे यांनी दिली.जेएसपीएमचे संचालक व टिएसएसएमचे सचिव गिरीराज सावंत,डॉ.रवी जोशी,डॉ. कन्हेयालाल बारबोले डॉ.हेमंत जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली हे मूल्यांकन पार पडले.

संस्थेचे संस्थापक सचिव व महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांनी सर्वांचे कौतुक करुन अभिनंदन केले. मूल्यांकन यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विभागप्रमुख प्रा.चैतन्य शेटगार प्रा.अक्षय गोडसे,प्रा.शिवराज बुगडे,प्रा.तेजस कदम,प्रा.सुप्रिया पाटील,प्रा.अमित करंजे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

वृक्ष लागवड केली... संगोपन कोण करणार?

बाणेर, बालेवाडी : रमेश जयस्वाल

औंध, बाणेर, बालेवाडी परिसरात स्मार्ट सिटीच्या अंतर्गत रस्ते, पदपथ, झाडे तसेच सिमेंटचा रस्ता आणि सुशोभीकरण अशी अनेक कामे झाली. रस्त्यालगत वृक्षारोपणावर भर देण्यात आला; परंतु या ठिकाणी लावलेल्या झाडांची रोपे अनेक ठिकाणी गायब झालेली आहेत तर काही ठिकाणी फक्त काड्या उभ्या आहेत. अनेक ठिकाणी शोभिवंत झाडे न लावता वृक्षलागवडीच्या नावावर कागदी फुलांचे काटेरी वृक्ष लागवड केली गेली आहे. या फुलांच्या झाडांना मोठमोठाले अनकूचीदार काटे येतात. शोभिवंत झाडे लावणे गरजेचे असतानाही कागदी फुलांची काटेरी झाडे लागवड करून शहराला विद्रूप करण्याचा प्रकार केला गेला. यात भर पडते ती गेल्या तीन महिन्यांपासून या लागवड केलेल्या झाडांना पाणी देण्यात आले नाही. त्यांची निगा न ठेवल्यामुळे झाडे वाळली आहेत.

बाणेर, ताम्हणे चौक, धनकूडे चौक, कळमकर चौक, पॅन कार्ड क्लब रोड अंतर्गत रस्त्यांचे सुशोभिकरण करताना पदपथावर खड्डे ठेऊन आणि रस्त्याच्या मध्यभागी वृक्षरोपण करण्यात आले होते. लावलेली रोपे हे सुशोभित न लावता शहराला विद्रूप करणारे रोपे लावण्यात आली. 'लिंब, पिंपळ, वड, रबराचे झाडे किंवा फुलझाडे, सावली देणारी झाडे आणि लवकर येणारी जास्त दिवस टिकणारी झाडे लावणे गरजेचे असतांनाही नियमाच्या विरोधात विद्रूपीकरण करणारे झाडे लावली. या झाडांची देखभाल केली जात नाही. अनेक झाडे करपली, वाळली आहेत. यांच्या फक्त काड्या उभ्या आहेत. झाडांच्या रक्षणासाठी कुंपणसुध्दा लावले नसल्यामुळे जनावरे यांना नष्ट करत आहेत.

अनेकवेळी झाडे लावून देखभाल न करता लावलेली झाडे कोणत्या प्रकारे येणार? झाडे लावण्याच्या नावावर शासनाला चुना लावण्याचा प्रकार घडत आहे. नियमानुसार झाडे न लावता आणि कागदी फुलांची काटेरी झाडे लावणे, निगा, देखभाल, पाणी न देण्याचा प्रकार, झाडांच्या रक्षणासाठी कुंपण न लावणे याचा विचार महानगरपालिका करेल काय? आणि याची चौकशी करून ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी येथील जनता करत आहे.

म्हसवड शहरासाठी आणखी १० कोटी रुपये मंजूर - मुख्याधिकारी डॉ. सचिन माने

म्हसवड : प्रतिनिधी

म्हसवड शहरासाठी आणखी १० कोटी रुपये मंजूर झाले असल्याची माहिती नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. सचिन माने यांनी दिली.

म्हसवड शहराच्या विकासासाठी आणखी १० कोटी रुपये मंजुर झाले असुन या १० कोटी रुपयांमध्ये पालिका हद्दीत राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्यापारी संकुल उभारणीसाठी अंदाजे ३ कोटी रुपये, उद्यमनगर क्र.१ येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन बांधकामासाठी २० लाख रुपये, पालिका हद्दीमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन बांधकामासाठी ५० लाख रुपये, म्हसवड - राऊतवाडी रस्ता डांबरीकरणासाठी ६० लाख रुपये, लांब मळा रस्ता डांबरीकरणासाठी ३० लाख रुपये, दहिवडे मळा ते नागोबा रस्त्याचे डांबरीकरणासाठी १ कोटी २५ लाख रुपये, बनगरवाडी रस्त्याचे डांबरीकरणासाठी ५० लाख रुपये, पालिका हद्दीतील बोनेवाडी येथे अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक भवन उभारणेसाठी २५ लाख रुपये, विरकरमळवी येथे सांस्कृतिक भवन बांधकामासाठी २५ लाख रुपये, सातारा - पंढरपुर अप्रोच विरकरमळवी रस्त्याच्या डांबरीकरणासाठी १५ लाख रुपये, पालिका हद्दीत क्रांतिवीर उमाजी नाईक समाज मंदिर उभारणेसाठी १५ लाख रुपये, म्हसवड ते नागोबा अप्रोच रस्ता ते मसाईवाडी समाजमंदिर रस्त्याच्या डांबरीकरणासाठी २० लाख रुपये, पंतवस्ती अंतर्गत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करण्यासाठी २० लाख रुपये, म्हसवड पालिका हद्दीतील विविध ठिकाणी असलेले चौक व मोकळ्या जागेचे सुशोभिकरण करण्यासाठी १ कोटी ४५ लाख रुपये, तर म्हसवड शहर व पालिका हद्दीत विविध ठिकाणी विद्युतीकरण करण्यासाठी १ कोटी रुपये असे एकुण १० कोटी रुपये शहराच्या विकासासाठी आणखी मंजुर झाले असल्याची माहिती म्हसवड पालिकेचे मुख्याधिकारी डॉ. सचिन माने यांनी दिली आहे.

सहा वर्षापासून कोठडीत असणाऱ्या अतुल इंगळे यास जामीन मंजूर

अकलूज : प्रतिनिधी

एका प्रकरणात उच्च न्यायालयाने ६ वर्षांपासून कोठडीत असलेल्या अतुल इंगळे या आरोपीला जामीन मंजूर केला आहे. अर्जदार हा मोका आणि खून प्रकरणात आरोपी होता ज्यामध्ये अग्निशस्त्र वापरण्यात आली होती. नानासाहेब आसबे यांच्या हत्येप्रकरणी अर्जदार आरोपी आहे.

न्यायालयाने त्यांना उच्च न्यायालयात जाण्याची मुभा दिली होती. अर्जदाराने या स्वातंत्र्याच्या अनुषंगाने उच्च न्यायालयासमोर जामीन अर्ज करण्यास प्राधान्य दिले जामीन मंजूर करण्याचे मुख्य कारण म्हणजे आरोपी सहा वर्षांपेक्षा जास्त काळ कोठडीत होता आणि फिर्यादीने सुमारे ८८ साक्षीदार तपासण्याचा प्रस्ताव दिला होता. खटला सुरू झालेला नाही आणि त्यामुळे त्याला मुख्यतः विलंबाच्या कारणावरून जामीन मंजूर करण्यात आला.

अकलूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अर्जदारानेच कट रचल्याचा आरोप आहे. आरोपीचा खटला माळशिरस येथील न्यायालयात प्रलंबित आहे. पहिला जामीन अर्ज माळशिरस येथील न्यायालयात जमीन नामंजूर करण्यात आला होता. अर्जदाराने मुंबई उच्च न्यायालयात जमीन अर्ज केला होता त्यास आज मे. मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. आरोपीच्या बाजूने ॲड. प्रियल सरडा, ॲड संदीप मगर यांनी बाजू मांडली. ॲड. मगर यांनी वेळोवेळी पाठपुरावा करत कामकाज पाहून यशस्वीरित्या जामीन मंजूर करून घेतला.

अल्पवयीन मुलीचे अपहरण

सातारा : प्रतिनिधी

अज्ञाताने अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याची तक्रार सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक १८ फेब्रुवारी रोजी नऊ वाजण्याच्या सुमारास तहसीलदार कार्यालय सातारा येथून अज्ञाताने बोरगाव, ता. सातारा येथील एका अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याची तक्रार सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

अधिक तपास पोलीस हवालदार दगडे करीत आहेत.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांबद्दल आपत्तीकारक विधान

शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांचा शेवगावमध्ये निषेध

शेवगाव : प्रतिनिधी

राज्यातील शाळांमधील टॉयलेट साफ सफाई चे काम हे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून केले जाणार असे वक्तव्य राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी केले होते त्याचा निषेध म्हणून आज शेवगाव तालुका महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघ शेवगाव यांच्या वतीने आज शेवगाव पंचायत समितीवर शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या या अपमान कारक वक्तव्याचा निषेध करण्यात आला.

१७ फेब्रुवारी २३ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगलु येथील महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे अधिवेशन राज्यातील शाळांमधील टॉयलेट साफ करण्याचे काम हे ग्रामपंचायत कर्मचारी करतील हे वक्तव्य केले होते. या दीपक केसरकर यांच्या वक्तव्याचा राज्यभर निषेध करण्यात येत आहे. आज सकाळी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघ शेवगाव यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कौशिक सदस्य कॉ संजय नांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली शेवगाव पंचायत समितीवर निषेध आंदोलन करून या वक्तव्याचा जाहीर निषेध केला. यावेळी केसरकर यांच्या विरोधात मोठी घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी बोलताना नांगरे म्हणाले की, केसरकर यांनी राज्यातील ६० हजार पंचायत कर्मचाऱ्यांचा अपमान केला आहे. अल्प वेतनावर काम करणाऱ्या ह्या कर्मचाऱ्यांची केसरकर यांनी एक प्रकारे थट्टा केली आहे. केसरकर यांनी तात्काळ या कर्मचाऱ्यांची माफी मागावी. असेही नांगरे म्हणाले.

या आंदोलनात ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे तालुका अध्यक्ष संजय डमाळ, संतोष लहासे, एकनाथ वखरे, नामदेव सानम, शेक नय्युम,खैरे नानासाहेब, सुधाकर निळ, आदिनाथ आंधळे, संजय तेलोरे, अब्दुल शेख, रामनाथ ससाणे, राम काळपुंड, रावसाहेब काते, लक्ष्मण बोरूडे, प्रकाश खंडागळे आदि कर्मचार्यांनी भाग घेतला.

यावेळी शेवगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी महेश डोके यांनी कर्मचाऱ्यांचे निवेदन स्वीकारले, व आपल्या भावना सरकारला कळविल्या जातील असे ते म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अकलूज परिसरात मोठ्या उत्साहात साजरी

अकलूज : प्रतिनिधी

कुळवाडी भूषण बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९३ वी जयंती अकलूज व परीसरातील शिवप्रेमींनी मोठ्या उत्साहात साजरी केली असून चौकाचौकात सामाजिक संघटनांनी भगवे झेंडे, पताके लावत छत्रपती शिवरायांना अभिवादन केले.

अकलूज येथील जयशंकर उद्यानात मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड,अकलूज नगरपरिषद व सर्व शिवप्रेमी यांच्या संयुक्तरीत्या कुळवाडीभूषण बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९३ व्या जयंती निमित्ताने माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनी शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन व पुतळ्यास पुष्पहार घालुन अभिवादन केले.यावेळी माजी सरपंच किशोरसिंह माने पाटील,शिवतेजसिंह मोहिते पाटील,विभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे, गटविकास अधिकारी विनायक गुळवे,नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दयानंद गोरे,पोलीस निरीक्षक अरुण सुगावकर,मराठा सेवा संघाचे उत्तमराव माने शेंडगे,रविंद्र पवार,डॉ.तानाजी कदम,जिजाऊ ब्रिगेडेच्या अक्काताई माने शेंडगे,वैशाली डोळस,प्रिया नागणे,मिनाक्षी जगदाळे, मनोरमा लावंड, वनिता कोरटकर,बबनराव शेंडगे,नवनाथ नागणे,उत्कर्ष शेटे,बाळासाहेब सणस, महादेव दळवी,डॉ. विठ्ठल कोडग,दिगंबर मिसाळ,नितीन मगर,उदय कदम यांच्यासह शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत डॉ.अमोल माने यांनी केले तर आर्वी, उर्वी माने व पुष्पराज माने यांनी जिजाऊ वंदना गायली. तसेच शिवप्रिया देशमुख,दुर्गा इंगळे,स्नेहल बोरकर यांनी मनोगत व्यक्त केले तर श्रेया शिंदेनी पोवाडा म्हणाला. अजित माने यांनी जय जय महाराष्ट्र माझा,गर्जा महाराष्ट्र माझा गीत गायले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन निनाद पाटील यांनी केले शेवटी आभार राजेंद्र मिसाळ यांनी मानले.

अकलूज शहरातील सर्व गणेशोत्सव मंडळे,नवरात्रोत्सव मंडळासह विजयचौकातील महाराजा प्रतिष्ठान,,छत्रपती प्रतिष्ठान,राजे युवा ग्रुप,वक्रतुंड गणेश मंडळ,गांधी चौकात लोकमान्य गणेशोत्सव मंडळ,सह्याद्री प्रतिष्ठान,छावा ग्रुप, सयाजीराजे मित्रमंडळ,छत्रपती गणेशोत्सव मंडळ,लहुजी साम्राज्य व छत्रपती प्रतिष्ठान,सदुभाऊ चौकात महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटना,दत्तचौकात नवक्रांती प्रतिष्ठान, महर्षी चौकात महाराजा प्रतिष्ठान, पैलवान प्रतिष्ठान, रामायण चौकात छत्रपती गणेशोत्सव मंडळ यांनी राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुतळ्यांचे पुजन करीत मोटारसायकल रॅली काढुन जयंती मोठ्या उत्साहाने शिवजयंती साजरी केली.

कोरेगावात पुकारलेला कडकडीत बंद यशस्वी

कोरेगाव : प्रतिनिधी

कोरेगाव नगरपंचायतीने घोषित केलेला अन्याय कारक विकास आराखडा रद्द होण्यासाठी बाधित शेतकरी व नागरिकांच्या वतीने 'कोरेगाव बंदची हाक सोशल मीडिया माद्यमातून व्हायरल करण्यात आली होती, त्याला नागरिकासह व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने कोरेगावात प्रथमताच शंभर टक्के बंद यशस्वी झाला. मात्र अचानक पुकारलेल्या कोरेगाव बंद मुळे आज सोमवारचा आठवडा बाजार असल्याने तालुक्यातून आलेल्या शेतकरी वर्गासह नागरिकांचे प्रचंड हाल झाले.

कोरेगाव नगरपंचायतीच्या वतीने घोषित करण्यात आलेला प्रारूप कोरेगाव शहर विकास आराखड्यात बहुसंख्य शेतकरी व नागरिकांना झळ बसली आहे तर अनेकांचे संसार अक्षरशः उघडे पडणार आहेत, त्यामुळे अन्यायकारक लादलेल्या विकास आराखड्याच्या विरोधात सोशल मीडियावर कोरेगाव बंदची हाक देण्यात आलेली होती.

पुकारलेल्या कोरेगाव बंद शंभर टक्के यशस्वी झाला असला तरी, बंदची जबाबदारी घेण्यासाठी कोणी ही पुढे आले नाहीत. कोणत्याही नेतृत्वाशिवाय बंद कडकडीत पाळला गेला.

मुख्य *संपादक : राही भिडे, हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. Declaration No. : SDM/SR/07/2023

राष्ट्रवादी काँग्रेसचा साताऱ्यात गुरुवारी लाठी मोर्चा

आमदार शशिकांत शिंदे प्रशासनाच्या विरोधात आक्रमक

सातारा : प्रतिनिधी

शिंदे, फडणवीस सरकार सत्तेत आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांसह प्रशासकिय अधिकारी निपक्षपणे काम करण्याऐवजी पक्षाचे कार्यकर्ते असल्यासारखे सुडबुद्धीने वागत आहेत.

सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली ही मंडळी काम करत असून या विरोधात आवाज उठवण्यासाठी येत्या गुरुवारी (ता. २३) राष्ट्रवादी काँग्रेसचा जिल्हाधिकारी कार्यालयावर निषेध लाठी मोर्चा काढण्यात येणार असून यावेळी अधिकाऱ्यांचाा पुराव्यांसह पोलखोल करणार असल्याचा इशारा राष्ट्रवादीचे आमदार शशिकांत शिंदे यांनी आज येथे दिला.

राष्ट्रवादी भवनात झालेल्या या पत्रकार परिषदेस जिल्हा सरचिटणीस राजकुमार पाटील, गोरखनाथ नलवडे, तेजस शिंदे, अतुल शिंदेंसह युवकचे पदाधिकारी उपस्थित होते. आमदार शिंदे म्हणाले, सातारा जिल्ह्यात राजकारण विरहित वातावरण होते, मात्र, सत्ता बदलानंतर सहा, सात महिन्यात विरोधकांचा आवाज दाबला जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांसह इतर सर्व अधिकारी एखाद्या पक्षाचा कार्यकर्ता असल्यासारखे वागत आहेत.

ते कोणाच्या दबावाखाली काम करतात हे पुराव्यासह उघडकीय आणणार आहे. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने गुरुवारी (ता. २३) सकाळी दहा वाजता बॉम्बे चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय असा लाठी मोर्चा काढण्यात येणार आहे. मेडिकल कॉलेजच्या भंगार चोरीबाबत एक महिन्यात कारवाईचे आश्वासन देऊनही अद्याप कोणी गुन्हा दाखल करायचा यातच सर्व अडकून पडले आहे.

भंगार चोरणाऱ्यांशी या अधिकाऱ्यांशी साटेलोटे आहे. शासकिय अधिकारी कोणाच्या दबावाखाली काम करतात, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी हे आंदोलन आहे. शेतकऱ्यांची कर्ज माफीचा दुसरा हप्ता मिळालेला नाही. शेतकऱ्यांची वीज तोडणे केली जात आहे. विज वितरणकडे डीपींची कमतरता आहे. नोकरभरतीकडे दूर्लक्ष झालेले आहे.

या सर्व बाबींवर आवाज उठविला जाणार आहे. एकुणच प्रशासकीय अधिकारी सत्ताधाऱ्यांच्या हातातील कटपूतली झाले आहेत. सुडबुद्धीने अधिकारी पूर्णपणे एकतर्फी वागत आहेत. हा जिल्ह्याचा मोर्चा असून कोरेगावमधून वाईट प्रवृत्ती हटविण्यासाठी आगामी काळात लढणार असल्याचे आमदार शिंदेंनी सांगितले.

मेढा नगरपंचायतीच्या करवाढ प्रक्रियेस स्थगिती

आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या पाठपुराव्याला यश; नगर विकास विभागाचे आदेश

सातारा : प्रतिनिधी

मेढा नगरपंचायतीने त्यांच्या हद्दीतील मालमत्ताची कर मुल्यनिर्धारण प्रक्रिया सुरु केली होती. मात्र नागरिकांच्या मागणीवरून या अन्यायकारक करवाढीच्या विरोधात आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी तेव्हाच मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्याकडे सदरची प्रक्रिया रद्द करण्याची मागणी केली होती आणि तेव्हाच मुख्यमंत्र्यांनी तसे तोंडी आदेशही दिले होते. त्यामुळे त्याचवेळी हि प्रक्रिया बंद करण्यात आली होती. दरम्यान, राज्याच्या नगरविकास विभागाने नुकताच रीतसर अध्यादेश काढून मेढा नगरपंचायतीच्या कर मुल्यनिर्धारण प्रक्रियेस स्थगिती दिल्याचे जाहीर केले असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

गेल्या काही दिवसांपासून घरपट्टी वाढीचा मुद्दा गाजत होता. मेढा नगरपंचायतीच्या हद्दीतील सर्व मिळकतधारांचा सर्व्हे पूर्ण करून करनिर्धारण यादी अंतिम करण्यात आली होती. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. नागरिकांनी आंदोलनही केले होते. त्याचवेळी आ. शिवेंद्रसिंहराजेंनी नागरिकांच्या मागणीनुसार सातारा दौऱ्यावर आलेल्या मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन सातारा पालिका आणि मेढा नगरपंचायतीच्या करवाढ आकारणी प्रक्रियेस स्थगिती देण्याची मागणी केली होती. आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या मागणीवरून मुख्यमंत्री ना. शिंदे यांनी त्याचवेळी सातारा पालिका आणि मेढा नगरपंचायत या दोन्ही संस्थांच्या करवाढ प्रक्रियेस स्थगिती देण्याचे तोंडी आदेश दिले आणि सदरची प्रक्रिया त्याचवेळी स्थगित करण्यात आली होती.

दरम्यान, शासनाच्या कार्यालयीन प्रक्रियेनुसार मेढा नगरपंचायतीच्या करवाढीला स्थगिती देण्याचा अध्यादेश राज्याच्या नगरविकास विभागाकडून नुकताच काढण्यात आला आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १२४ (२) मधील तरतुदी विचारात घेऊन मेढा नगरपंचायतीने सुरु केलेल्या कर मुल्यनिर्धारण प्रक्रियेस चालू असलेल्या टप्प्यावर शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात येत असून नगरपंचायतीने सदर प्रक्रिया स्थगित ठेवून याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करावा, असे आदेश नगर विकास विभागाचे कार्यासन अधिकारी वि. ना. धाईजे यांनी मेढा नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे मेढा नगरपंचायतीच्या करवाढ प्रक्रिया स्थगिती बाबतच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून राज्य शासनस्तरावून अध्यादेशाद्वारे स्थगिती मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. करवाढ प्रक्रियेला स्थगिती मिळवून दिल्याबद्दल नागरिकांनी आ. शिवेंद्रसिंहराजे यांचे आभार मानले आहेत.

आ. जयकुमार गोरे यांचा म्हसवड येथे होणार नागरी सत्कार

म्हसवड : प्रतिनिधी

माण - खटावचे लोकप्रिय आ. जयकुमार गोरे यांनी म्हसवड शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडवण्यासाठी शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी तब्बल ७९.११ कोटी रुपयांचा निधी मंजुर केल्याबद्दल म्हसवडकर नागरीकांच्या वतीने शुक्रवार दि. २४ रोजी त्यांच्या भव्य अशा नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे.

म्हसवड शहरासाठी सध्या अस्तित्वात असलेली पाणी पुरवठा योजना ही कालबाह्य झाली असल्याने त्याचा विपरीत परिणाम शहराच्या पाणी पुरवठ्यावर झाला आहे, त्यामुळे शहरात पिण्याचे पाणी हे ८ ते १० दिवसांतुन येत असल्याने म्हसवडकरांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल होत आहेत, म्हसवडकरांचे सध्या होत असलेले पाण्यासाठीचे हाल हे केवळ यापुर्वीच्या पालिकेतील सत्ताधाऱ्याच्या नाकर्ते पणामुळेच होत असुन म्हसवडकरांचे पाण्यासाठीची होणारी ससेहोलपट आपण नक्की थांबवु व शहराला दररोज मुबलक व दैनंदिन पाणी उपलब्ध करुन देवु असा शब्द माणचे आ. जयकुमार गोरे यांनी म्हसवडकरांना यापुर्वी दिला होता, त्यानुसार आ. गोरे यांनी राज्यातील सत्ताबदल होताच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या माध्यमातुन फक्त म्हसवड शहराच्या पाणी योजनेसाठी

तब्बल ७९.११ कोटी रुपयांचा निधी मंजुर केला आहे.

म्हसवडकरांना दिलेला शब्द आ.गोरे यांनी पाळला असल्याने आ. गोरे यांच्या सत्काराचे आयोजन म्हसवडकर जनतेतुन करण्यात आले आहे. सदर नागरी सत्कार हा शुक्रवार दि. २४ फेब्रुवारी रोजी म्हसवड पालिकेच्या समोर आयोजीत करण्यात आला असुन यासाठी म्हसवड पंचक्रोशीतील नागरीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आ. गोरे म्हणजे वचनपुर्ती करणारा नेता - माजी नगराध्यक्ष विजय धट

माण - खटावला लाभलेले आ. जयकुमार गोरे हे सर्वसामान्य जनतेचे नेतृत्व आहे, त्यांच्या कार्यक्षमतेमुळेच गत १५ वर्षात माण व खटावच्या भुमीत विकासगंगा वाहु लागली आहे. राजकारणापुरते राजकरण करणारे आ. गोरे हे नेहमीच राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक महत्व देत आले आहेत, त्यामुळेच माण - खटावची जनता त्यांच्यावर वेड्यासारखी प्रेम करीत आहे.

गतवेळी म्हसवड शहरात खुप मोठी विकासकामे आ. गोरे यांनी केली मात्र काही कारणांमुळे म्हसवड पालिकेची सत्ता आमची गेली तरी देखील म्हसवडकर जनतेला पिण्याच्या पाण्याची सध्या जी गैरसोय होत आहे ती सोडवण्याचा शब्द हा आ. गोरे यांनीच दिला होता आणि तो सोडवला देखील त्यांनीच, त्यामुळे आ. गोरे म्हणजे विकासकामाची वचनपुर्ती आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नसल्याचे यावेळी माजी नगराध्यक्ष विजय धट यांनी स्पष्ट केले.

विनयभंगासह मारहाण केल्याप्रकरणी आठ जणांवर गुन्हा

सातारा : प्रतिनिधी

विनयभंगासह मारहाण केल्याप्रकरणी आठ जणांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक १८ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास अजंठा चौक पुलाच्या खाली सुनिता आपल्या शिंदे राहणार तासगाव तालुका सातारा यांना मारहाण करीत त्यांचा विनयभंग केल्याप्रकरणी अनुसन पितांबर शिंदे, मेरनाम पितांबर शिंदे, उत्तेकर पितांबर शिंदे, काजल मेरनाम शिंदे, पितांबर चिलबिल्या शिंदे (सर्व राहणार सातारा) आणि सोनबाला डिटेल काळे, डिटेल कापीत काळे, गुंड्या कापीत काळे (तिघेही राहणार त्रिपुटी, तालुका कोरेगाव) यांच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अधिक तपास पोलीस हवालदार पोळ करीत आहेत.

अंमली पदार्थांची शेती केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

सातारा : प्रतिनिधी

अंमली पदार्थांची शेती केल्याप्रकरणी तिघांवर वडूज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १८ फेब्रुवारीच्या पूर्वी शांताराम रामचंद्र म्होप्रेकर, चंद्रभागा शिवाजी म्होप्रेकर आणि विमल पंढरीनाथ म्होप्रेकर यांनी त्यांच्या शेतात मधोमध गहू हरभरा कांदा पिकाच्या आडोशाला महाराष्ट्र राज्यात बंदी असलेल्या अमली पदार्थ असणाऱ्या अफू पिकाची स्वतः च्या आर्थिक हितासाठी लागवड करून त्याचे संवर्धन व जोपासना केल्याने लागवडीनंतर या पिकास सुमारे दोन ते अडीच फूट उंचीची ओलसर हिरवीगार पाने त्यांना फुले व हिरवी गोलाकार बोंडे लागलेली आढळून आली. हा सर्व माल पोलिसांनी जप्त केला असता त्याचे वजन ७५ किलो ४८० ग्राम भरले. त्याची बाजारपेठेतील किंमत एक लाख ५२ हजार ९६० रुपये असून हा माल जप्त करण्यात आला आहे.

अंमली पदार्थाची शेती केल्याप्रकरणी संबंधित तिघांवर वडूज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

जातीवाचक शिवीगाळीसह मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांवर गुन्हा

सातारा : एकास जातीवाचक शिवीगाळीसह मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १९ फेब्रुवारी रोजी अकरा वाजण्याच्या सुमारास साईबाबा मंदिर गोडोली च्या समोर असणाऱ्या संतोष वडापाव स्टॉलच्या इथे आतिश आनंदा कांबळे रा. विलासपूर, गोडोली, सातारा यांना मयूर सपकाळ व त्याच्या इतर पाच ते सहा साथीदारांनी जातिवाचक शिवीगाळ करत मारहाण केली. याप्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपाधीक्षक मोहन शिंदे करीत आहेत.

फलटण तालुक्याच्या सर्वांगीण विकासात खा. रणजितसिंह ना. निंबाळकर यांचे योगदान प्रेरणादायी : जयकुमार शिंदे

फलटण : प्रतिनिधी

फलटण तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न पूर्णत्वास नेण्यासाठी प्राध्यान्याने कृषी, औद्योगिक विकासाला गती देत खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी केंद्र व राज्य शासन आणि भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून केलेले काम प्रेरणादायी असल्याचे स्पष्ट प्रतिपादन भारतीय जनता पक्ष जिल्हा सरचिटणीस जयकुमार शिंदे यांनी केले आहे.

नाईकबोमवाडी, ता. फलटण येथे मंजूर असलेल्या औद्योगिक वसाहत नामफलक उभारणी व त्याचे अनावरण छ. शिवाजी महाराज जयंती आणि खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून समारंभ पूर्वक करण्यात आले. त्यावेळी जयकुमार शिंदे बोलत होते. यावेळी स्वराज पत संस्थेचे चेअरमन अभिजीत नाईक निंबाळकर, सचिन अहिवळे, अशोकराव जाधव, राजेश शिंदे, अमोल सस्ते, लतीफ तांबोळी, रियाज इनामदार, बबलू मोमीन, राजेंद्र निंबाळकर, संजय गायकवाड, तानाजी करळे, सुरज तांदळे, रवि पवार, बापूराव चव्हाण, सरपंच दत्तात्रय चव्हाण, दयानंद घाडगे, बाबु जाधव, मंगेश चव्हाण, गणेश ढेंबरे, सोमनाथ चव्हाण, बाळासाहेब साळुंके आणि नाईकबोमवाडी व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

नाईकबोमवाडी औद्योगिक वसाहत नामफलकासमवेत भाजपा पदाधिकारी, सरपंच व ग्रामस्थ.

फलटण तालुक्याच्या कायम दुष्काळी पट्ट्यात कृष्णेचे पाणी पोहोचवून तेथील शेतीला ऊर्जितावस्था आणि शेतकऱ्यांना समाधान देण्यासाठी नीरा - देवघर प्रकल्पाच्या कालव्यांसह त्यावरील नियोजित उपसा सिंचन योजना पूर्ण करणे आणि नाईकबोमवाडी, ता. फलटण येथील औद्योगिक वसाहतीची उभारणी याला प्राधान्य देवून खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी गेल्या एक दीड वर्षात केलेले प्रयत्न यशस्वी होत असून नीरा - देवघरच्या उर्वरित कामासह संपूर्ण प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता, सदर प्रकल्प ७५ % क्षमतेवर असल्याचे स्पष्ट झाल्याने आता प्रकल्पाला केंद्र व राज्य शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध होण्यात अडचण नसल्याचे स्पष्ट झाले आहे तर नाईकबोमवाडी औद्योगिक वसाहतीला शासनाने हिरवा कंदील दाखविला असून आज नामफलक उभारण्यात आला असल्याने भविष्यात येथील कृषी औद्योगिक विकास गती घेईल असा विश्वास जयकुमार शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

कृषी औद्योगिक विकासामुळे तरुणांना नोकरी आणि उद्योग व्यवसायाच्या संधी उपलब्ध होणार असून नाईकबोमवाडी औद्योगिक वसाहती मध्ये येथील तरुणांना छोटे प्रकल्प उभारुन तालुक्याच्या औद्योगिक विकासाला गती देताना स्वतः उद्योजक बनण्याची, आपल्या कुटुंबाचा विकास साधण्याची संधी मिळणार आहे, त्याच बरोबर कृषी क्षेत्रात फळबाग व तत्सम पिके घेऊन येथे कृषी प्रक्रिया उद्योगांची उभारणी करण्याची संधी येथील शेतकरी तरुणांना लाभणार असल्याचे जयकुमार शिंदे यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

प्रारंभी नामफलकाची उभारणी झाल्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन करुन श्रीफळ वाढविण्यात आले.

बिगुल वाजवून छ. शिवरायांना मानवंदना

समता सैनिक दलाचे अनोखे अभिवादन

सातारा : प्रतिनिधी

ऐतिहासिक साताऱ्यात समता सैनिक दलाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. शहारातून संचलन करत व बिगूल वाजवून महाराजांना मानवंदना देवून अभिवादन केले गेले. समता सैनिक दलाचे प्रमूख अरुण पोळ यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास जयघोषाच्या निनादत भव्य पुष्पहारही अर्पण करण्यात आला.

महाराजांच्या जयंतीनिमित्त 'भीमराय ते शिवराय' हा परिवर्तनशील विचारांचा जागर व्हावा आणि समस्त बहुजनांच्या कल्याणात आनंद मानणारे स्वातंत्र्य, समता, बंधुत्वाचे मूल्य प्राधान्याने जपले जावे, शिवाय सामाजिक सलोखा अबाधित रहावा या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास अभिवादन करून संचलनास प्रारंभ करण्यात आला. हे संचलन सवाद्यासह कर्मवीर भाऊराव पथ मार्गे छत्रपती शिवाजी महारांजाच्या पुतळ्याजवळ पोहचले. या दरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांच्या गगनभेदी जयघोषाने अवघा परिसर दणाणून गेला.

समता सैनिक दलाचे प्रमुख अरुण पोळ व अरुण भोसले यांनी

छत्रपती शिवाजी महारजांच्याबद्दलचे आणि एकूणच जयंती उत्सवाचे महत्त्व विषद केले. यावेळी कमांडर इन चिफ वसंत वाघमारे, कमांडर आकाश कांबळे, कमांडर यशपाल बनसोडे आदी उपस्थित होते.

मल्लांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे ध्येय ठेवावे

आमदार महेश शिंदे यांचे प्रतिपादन

सातारा : प्रतिनिधी

खेळाडूंनी कोणताही खेळ असूद्या त्यात करिअर कसे घडेल हे पहिले पाहिजे. बऱ्याचदा कुस्तीपटूंचे लक्ष गावोगावच्या मैदानांकडे अधिक असते. कारण त्यावरच त्यांचे पोट अवलंबून असते. मात्र त्यातून शासकीय स्पर्धांकडे दुर्लक्ष होते. त्याचा फटका करिअरला बसतो. केवळ बक्षीस आणि डामडौलासाठी मैदाने मारण्यापेक्षा करिअरसाठी जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे ध्येय समोर ठेवणे आवश्यक असल्याचे मत आ. महेश शिंदे यांनी व्यक्त केले.

जिल्हा क्रीडा संकुल येथे राज्यस्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा क्रीडाधिकारी युवराज नाईक, स्व. खाशाबा जाधव प्रतिष्ठानचे अध्यक्ष रणजित जाधव, दिलीप पवार, रघुनाथ जाधव हे उपस्थित होते.

आ. शिंदे पुढे म्हणाले, शालेय स्तरावर पालकांचे खेळाकडे होत असलेले दुर्लक्ष. शाळांची उदासीनता यामुळे खेळाचे वातावरण तयार होत नाही. आज गुणवत्ता असूनही आपण खूप मागे पडलो आहोत. त्यामागची कारणे खूप आहेत. पालकांकडून आणि समाजाकडून खेळाडूंना प्रोत्साहन मिळाले पाहिजे. परीक्षेत गुण मिळतात म्हणून खेळ नको. दोन-चार वर्षे शिकल्यानंतर ही मुले ट्रॅक बदलून शैक्षणिक करिअरकडे वळतात. त्यामुळे या खेळातील गळतीचे प्रमाण वाढले आहे. राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय यशासाठी दीर्घकालीन खेळावे लागते. यावेळी हे उपस्थित होते. यावेळी आठ विभागातील ३०० मल्लांनी यावेळी सहभागी झाले आहेत.

ओबीसीतर्फे छ. शिवरायांना अभिवादन

सातारा : प्रतिनिधी

जिल्हा ओबीसी संघटनेतर्फे येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

शिवरायांसोबत सर्व जाती धर्माचे शुर वीर होते. त्यांना सोबत घेवून प्रेरणा देवून स्वराज्य निर्माण केले.शिवा काशिद, जीवा महाले,बाजी प्रभू देशपांडे, मुरारबाजी,तानाजी मालुसरे कितीतरी नावे आहेत प्रेरणा देणारा खंबीर असेल तर मावळे जीव द्यायला तयार होतात.पण, नेतृत्व छ. शिवराय यांच्यासारखे खंबीर पाहिजे.असे विचार जिल्हाध्यक्ष भरत लोकरे यांनी व्यक्त केले.

यावेळी महासचिव क्षीरसागर शहराध्यक्ष श्रीकांत आंबेकर, समाजसेवक फारुख शेख व संजय परदेशी उपस्थित होते.

महाशिवरात्रीनिमित्त मुस्लिम समाजाकडून केळी वाटप

म्हसवड : प्रतिनिधी

महाशिवरात्री च्या निमित्ताने म्हसवड येथील कोटातील महादेव मंदीर येथे मुस्लीम बांधवांनी सर्वांना महाशिवराञी च्या शुभेच्छा दिल्या व केळी वाटप करण्यात आले.

राष्ट्रीय कॉग्रेसचे पदाधिकारी असलेले गब्बारभाई काझी हे नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर राहुन समाजसेवा, व सामाजिक सलोखा राखण्याचे काम ते नेहमीच करीत असतात, म्हसवड शहर हे तसे हिंदु - मुस्लिम ऐक्याचे प्रतिक आहे, प्रत्येक हिंदु सणांमध्ये काझी हे नेहमीच सहभागी होत असतात, तर त्यांनी आयोजीत केलेल्या इप्तार पार्टीला सर्वच क्षेत्रातील विविध मान्यवर नेहमीच हजेरी लावत असतात. आषाडी एकादस असो अथवा महाशिवरात्र अशा

कोणत्याही हिंदुच्या सणात व उत्सवात गब्बार काझी नेहमीच सहभागी होवुन त्यामध्ये आपले योगदान देत आले आहेत.

दि.१८ रोजी झालेल्या महाशिवरात्रीचे औचित्य साधत गब्बार काझी यांनी आपल्या काही मुस्लिम व हिंदु बांधवांसोबत म्हसवड येथील कोटेश्वर मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांना फराळ म्हणुन केळीचे वाटप करीत सामाजिक बांधिलकी जोपासत हिंदु - मुस्लिम भाई - भाई चा नारा दिला. यावेळी आरिफ तांबोळी, सचिन शांताराम माने, संभाजी राजेमाने, लाला तांबोळी, खंडेंराव ताबवे, रियाज काझी आदी उपस्थित होते.

रशियाला पराभूत करणे अशक्य, कुणाची मदतही नको : पुतीन

आपला दबदबा वाढविण्यासाठी पाश्चिमात्य शक्ती युक्रेनच्या खांद्यावर बंदूक ठेवून चालत आहेत

मॉस्को : वृत्तसंस्था

रशिया-युक्रेन युद्धाला २४ फेब्रुवारी रोजी १ वर्ष पूर्ण होत आहे. या निमित्ताने रशियन राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन जनतेला संबोधित करत आहेत. पुतीन म्हणाले - रशियाने सुरुवातीला युद्ध टाळण्यासाठी विविध प्रकारचे डिप्लोमॅटीक प्रयत्न केले. पण नाटो व अमेरिकेमुळे ते निष्फळ ठरले. आम्हाला आताही चर्चा हवी आहे. पण यासाठी कोणत्याही प्रकारची अट मंजूर नाही.

पुतीन म्हणाले की, युक्रेनला दीर्घ पल्ल्याची सुरक्षा यंत्रणा दिली जात आहे. यामुळे आमच्या सीमा संकटात सापडल्या आहेत. रशिया व युक्रेनचा मुद्दा लोकल होता. पण अमेरिका व तिच्या मित्रांनी तो ग्लोबल बनवला. आमची युद्ध करण्याची इच्छा नाही. पण आम्ही कोणत्याही किंमतीवर आमच्या देशाची सुरक्षा करणार.

पुतीन म्हणाले, पाश्चिमात्य शक्तीमुळे युद्धाचा भडका उडाला ही वस्तुस्थिती आहे. आम्ही त्यावेळी सर्वोतपरी प्रयत्न केले. ते लोक युक्रेनच्या खांद्यावर बंदूक ठेवून चालवत आहेत. त्यांना मूर्ख बनवत आहेत. आम्हाला आमच्या देशाची सुरक्षा करता येते. अमेरिका व तिचे सहकारी केवळ आपला दबदबा वाढवण्याच्या कारस्थानासाठी दुसऱ्यांना बळीचा बकरा बनवत आहेत. पाश्चिमात्य शक्तींनीच युद्धाचा जिन्न बाटलीतून बाहेर काढला. तेच आता त्याला बाटलीत पुन्हा टाकू शकतात. आम्ही केवळ आमचा देश व आमच्या नागरिकांच्या सुरक्षा करत आहोत. डोनबासचा मुद्दा रशियाने नेहमीच शांततेने सोडवण्याचा प्रयत्न केला. पण रशियावर आरोप करणाऱ्यांनी प्रथम पाश्चिमात्य नेत्यांनी काय केले हे पहावे. या लोकांनी केवळ धोका दिला. खोटारडेपणा केला. पाश्चिमात्य शक्तींना सन्मान देणे ठावूक नाही. ते संपूर्ण जगावर थुंकण्याचा प्रयत्न करत आहेत. हाच प्रकार ते आपल्या देशातील जनतेसोबतही करत आहेत. पाश्चिमात्य देशांच्या कुरापतींमुळे आम्हाला युक्रेनवर हल्ला करावा लागला. आमच्या सुरक्षेसाठी युक्रेनवर हल्ला करणे गरजेचे होते. डोनबासच्या नागरिकांनी रशियन सरकारकडे मदतीची याचना केली होती. ज्या प्रकारे या ताकदींनी युगोस्लाव्हिया, इराक, लीबिया व सीरियाला उद्ध्वस्त केले. आता त्यांची



युक्रेनसोबतही हेच करण्याची इच्छा आहे.

रशिया आपल्या सन्मानाशी कोणतीही तडजोड करणार नाही हे लक्षात घ्या. युक्रेनमध्ये डोनबासचा मुद्दा सोडवण्याची ताकद नाही तेथील लोकांना रशियाने आपल्या समस्या सोडवाव्यात असे वाटते. हा मुद्दा युद्धाने सोडवता येईल असे मी केव्हाच म्हणालो नाही. चर्चा झाली पाहिजे. पण ती योग्य पद्धतीने झाली पाहिजे. रशियाने यापूर्वी केव्हाही दबावाला भिक घातली नाही आणि यापुढेही घालणार नाही.

आम्हाला पाश्चात्य शक्तींशीही बोलणी करण्यास कोणतीही हरकत नाही. दोघांमध्ये संयुक्त सुरक्षा संरचना हवी असे आम्हाला वाटते. यासाठी मी स्वतः अनेक वर्षे प्रयत्न केले. पण अमेरिका व इतर पाश्चिमात्य शक्तींना तोडगा नको आहे. आमच्याकडे नेहमीच दुर्लक्ष झाले. जगातील कोणत्या देशाचे अमेरिकेसारखे दुसऱ्या देशांत लष्करी तळे आहेत? त्यानंतरही ते शांततेच्या गप्पा मारतात, तर आम्हाला विचार करावा लागतो.

पुतीन म्हणाले की, पाश्चिमात्य देश आध्यात्मिक विध्वंसाकडे वाटचाल करत आहेत. ते आमच्या चर्च व संस्कृतीवर घाला घालत आहेत. त्यांचे धर्मगुरूही 'सेम सेक्स मॅरेज'चे समर्थन करत आहेत.

रशियन राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांनी आपल्या भाषणाच्या शेवटच्या काही मिनिटांत एक महत्त्वाची घोषणा केली. त्यांनी अण्वस्त्रांविषयी अमेरिकेशी करण्यात आलेली स्टार्ट न्यू ट्रीटी मान्य करण्यास नकार दिला. ५ फेब्रुवारी २०११ रोजी रशिया-अमेरिकेत यांच्यात न्यू स्टार्ट ट्रीटी झाली. दोन्ही देशांतील अण्वस्त्रांची संख्या मर्यादित करणे हा या कराराचा उद्देश होता. या अंतर्गत दोन्ही देशांनी १५५० पेक्षा जास्त अण्वस्त्रे व ७०० पेक्षा जास्त स्ट्रॅटेजिक लाँचर्स न बाळगण्याचा निर्णय घेतला. या कराराची मुदत १० वर्षे म्हणजे २०२१ पर्यंत होती. ती २०२६ पर्यंत ५ वर्षांनी वाढवण्यात आली. आता ती पुतीन यांनी रद्द केली आहे.

आमचे युद्ध युक्रेनच्या जनतेसोबत नाही. कारण, त्यांना तेथील सरकारने आपल्या ओलीस ठेवले आहे. रणांगणात रशियाचा पराभव करणे केवळ अशक्य आहे हे जगाने कान उघडून ऐकावे. पाश्चिमात्य शक्तींना युरोपमध्ये पोलिसांची भूमिका बजावायची आहे. आमम्ही आमच्या मुलांवर कोणताही धोका येऊ देणार नाही.

नाटो या जगातील सर्वात श्रीमंत देशांच्या संघटनेने गरीब देशांच्या मदतीसाठी ६० अब्ज डॉलर्स दिले ही चांगली गोष्ट आहे. पण त्याच देशांनी युद्धासाठी १५० अब्ज डॉलर्सच्या निधीची तरतूद केली हे ही आपल्याला पहावे लागेल. हा दुटप्पीपणा नव्हे तर दुसरे काय आहे?

पुतीन यांनी जवळपास तासभर भाषण केले. पोलंडच्या वॉरसॉ येथे उपस्थित अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी हे भाषण काळजीपूर्वक ऐकले. सूत्रांच्या माहितीनुसार, काही वेळातच अमेरिका व पाश्चिमात्य देश पुतीन यांच्या आरोपांना विस्तृतपणे उत्तर देतील.

मोदी है तो मुमकीन है! सेमीकंडक्टर प्लांट गुजरातमध्ये होणार

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

गेल्या तीन वर्षापासून सेमीकंडक्टरच्या कमतरतेमुळे जगातील अनेक देश त्रस्त आहेत. भारत सुद्धा यातील एक देश आहे. सेमीकंडक्टर मॅन्यूफॅक्चरिंग मध्ये अमेरिकेचे योगदान १२ टक्के आहे, तर ८० टक्के सेमीकंडक्टर आशियातील देशात तयार केले जाते. आता यात आणखी वाढ होणार आहे. समूह वेदांता आणि इलेक्ट्रॉनिक्स मॅन्यूफॅक्चरिंग दिग्गज फॉक्सकॉन गुजरातमधील धोलेरोमध्ये सेमीकंडक्टर मॅन्यूफॅक्चरिंगच्या प्लांटसाठी सुरुवात केली जात आहे. याची माहिती राज्य सरकारमधील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने मीडियाशी बोलताना दिली आहे.



रिपोर्टच्या माहितीनुसार, स्वतंत्र भारतातील इतिहासातील ही सर्वात मोठी गुंतवणूक आहे. वेदांता आणि फॉक्सकॉनने गेल्या सप्टेंबर महिन्यात गुजरात सरकार सोबत प्लांट लावण्यासाठी १ लाख ५४ हजार कोटी रुपयाच्या एका समझोत्यावर हस्ताक्षर केली आहेत. यामुळे भारतात आता पहिल्यांदा सेमीकंडक्टर्ससाठी मॅन्यूफॅक्चरिंग फॅसिलिटी होईल. भारतात अनेक प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक गॅझेटचे निर्माण करीत आहेत. परंतु, सेमीकंडक्टर भारतात पहिल्यांदा तयार केले जाईल.

देशात पहिल्यांदा सेमीकंडक्टर प्लान मध्ये दोन्ही कंपन्या संयुक्तपणे १ लाख ५४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहेत. या गुंतवणुकीमुळे जवळपास १ लाख लोकांना नोकरी मिळणार आहे. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी म्हटले की, गुजरातमध्ये प्लांट स्थापन करण्यात सरकार सुविधा आणि मदत देईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विधानसभा निवडणुकीआधी नोव्हेंबर मध्ये भावनगर मध्ये एका निवडणुकीच्या रॅलीत संबोधित करताना स्पष्ट संकेत दिले होते की, अहमदाबाद पासून जवळपास १०० किमी दूर असलेल्या धोलेरा एसआयआरमध्ये मोठा सेमीकंडक्टर प्लांट लावला जाईल.

सत्तासंघर्षावर आज पुन्हा 'सर्वोच्च' सुनावणी

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

राज्यातील सत्तासंघर्षावर सर्वोच्च न्यायालयाच्या ५ न्यायमूर्तींसमोर आजपासून पुन्हा सलग ३ दिवस सुनावणी सुरू झाली. आज ठाकरे गटाचे वकिल ॲड. कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला. त्यानंतर आता या प्रकरणात उद्या पुन्हा सुनावणी होणार आहे. आज पूर्णवेळ कपिल सिब्बल यांनीच युक्तिवाद केला. निवडणूक आयोगाने दुसरी बाजू गृहीत न धरता पक्ष आणि चिन्हावर निर्णय दिला असे ठाकरे गटातर्फे त्यांनी म्हणणे मांडले.

शिंदे गटाच्या १६ आमदारांच्या अपात्रतेचे प्रकरण, विधानसभा अध्यक्षांचे अधिकार, पक्षांतर बंदी कायदा या प्रमुख मुद्द्यांवर दोन्ही गटांकडून पुन्हा युक्तिवाद करण्यात येत आहे. तसेच, या प्रकरणात अरुणाचल प्रदेशातील नबाम रेबिया प्रकरणाच्या निकालाचा संदर्भ लागू होतो की नाही, यावरही ठाकरे व शिंदे गटाकडून युक्तिवाद करण्यात येणार आहे.

हिजबुल मुजाहिद्दीनचा टॉप कमांडर बशीर अहमद ठार

नमाज अदा केल्यानंतर २ हल्लेखोरांनी झाडल्या गोळ्या

काबूल : वृत्तसंस्था

हिजबुल मुजाहिद्दीनचा टॉप कमांडर बशीर अहमद पीर सोमवारी पाकिस्तानातील रावळपिंडी येथे ठार झाला. हल्लेखोराने रावळपिंडीतील एका दुकानाबाहेर पीरवर गोळ्या झाडल्या, यातच त्याचा मृत्यू झाला. दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याबद्दल त्याला गेल्या वर्षी ४ ऑक्टोबर रोजी दहशतवादी घोषित करण्यात आले होते. माजी अतिरेक्यांना हिजबुल मुजाहिदीन, लष्कर-ए-तैयबा यांसारख्या आघाडीच्या संघटनांशी जोडण्यासाठी अनेक ऑनलाइन कारवायांमध्ये पीरचा सहभाग होता.

बशीर घराजवळील मशिदीत नमाज अदा करण्यासाठी गेला होता. मशिदीतून बाहेर आल्यानंतर तो एका दुकानाजवळ उभा राहिला. दरम्यान, दोन हल्लेखोर दुचाकीवरून आले आणि त्यांनी बशीरची गोळ्या झाडून हत्या केली.

बशीर अहमदला इम्तियाज आलम या नावानेही ओळखले जात होते. जम्मू-काश्मीरमध्ये अनेक दहशतवादी घटना घडवण्यात त्याचा हात होता. हाजी, पीर आणि इम्तियाज या कोड नेमने तो जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी घटना घडवत असे. बशीर गेल्या काही वर्षांपासून रावळपिंडीत राहत होता. पाकिस्तान सरकारने त्याला देशाचे नागरिकत्व दिले होते.

जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांची घुसखोरी करण्याचे काम आयएसआयने बशीरवर सोपवले होते. जम्मू-काश्मीरमध्ये हिजबुल मुजाहिद्दीन आणि लष्कर-ए-तैयबाच्या माजी दहशतवाद्यांना पुन्हा सक्रिय करण्यात त्याचा हात होता. तो सतत इंटरनेटच्या माध्यमातून लोकांना काश्मीरविरोधात चिथावणी देत होता.

पुरातत्त्व विभागाच्या संचालकांनी केली छत्रपती शिवाजी संग्रहालयाची पाहणी

सातारा : प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी संग्रहालयाच्या रंगरंगोटीचे काम सुरू झाले आहे. येथील प्रस्तावित कामांची पुरातत्त्व विभागाचे संचालक तेजस गर्गे यांनी पाहणी केली यावेळी कोल्हापूर येथील संग्रहालयाचे अभिरक्षक उदय सुर्वे,छत्रपती शिवाजी संग्रहालयाचे सहाय्यक अभिरक्षक प्रवीण शिंदे,माजी उपनगराध्यक्ष सुहास राजशिर्के, सामाजिक कार्यकर्ते महारुद्र तिकुंडे, व संदीप पोळ इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

तेजस गर्गे यांनी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले . तसेच शिवरायांच्या तख्ताची सुद्धा पाहणी केली शिवजयंतीच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी संग्रहालचे इमारतीला झळाळी आली आहे तसेच वेळोवेळी झालेल्या आंदोलनामुळे प्रशासनाने सुद्धा या इमारतीच्या पुढील कामाची दखल घेतली असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून ६१ लाखाची पुढील कामे सुरू झाली आहेत.

यामध्ये दालनांचे प्रशस्तीकरण मजबुतीकरण, ऐतिहासिक वस्तूंची साजेशी मांडणी तसेच इतर सुविधा, दालनांची रंगरंगोटी ,इत्यादी कामांसाठी सध्या पहिल्या टप्प्यात ६१ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे त्या कामांची निविदा काढण्यात आली असून संबंधित ठेकेदार ने काम सुरू केले आहे या कामांच्या संदर्भामध्ये गर्गे यांनी ठेकेदाराला सूचना देऊन हे काम तातडीने पूर्ण करून घेण्याचे आदेश दिले ही कामे तात्काळ दर्जेदार पद्धतीने कशा स्वरूपात होतील याकडे लक्ष देण्यात यावे अशा सूचनाही गर्गे यांनी यावेळी केल्या आहेत.

पिलीव येथील श्रीमती आनंदी काळे यांनी रांगोळीतून साकारली रयतेच्या राजाची हुबेहूब प्रतिमा..!

अकलूज : प्रतिनिधी

आपल्या राजकीय विरोधकांच्या आईचा,पत्नीचा,मुलांचा,बहिणीचा आदर,सन्मान आणि संरक्षण करण्याचे शिवरायांचे धोरण होते. त्या धोरणाची त्यांनी काटेकोरपणे अंमलबजावणी केली. मोगल इतिहासकार खाफीखान लिहितो, ''जसा भाऊ बहिणीशी वागतो किंवा मुलगा आईशी वागतो तसे शिवाजी महाराज स्त्रियांशी वागायचे.'' शिवरायांनी नेहमीच धर्मग्रंथ,धार्मिक स्थळे,स्त्रिया आणि लहान मुलांचा सन्मान केला. आपल्या शत्रू पक्षाच्याही महिलांचा सन्मान करावा,अशी नैतिकता होती. त्यामुळेच त्यांनी स्वराज्यातील व परराज्यांतील महिलांचे संरक्षण केले. परस्त्रीला आपल्या आया-बहिणीसारखी वागणूक देणाऱ्या रयतेच्या राजाला माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील श्रीमती आनंदी गजानन काळे या जिल्हा परिषदेच्या शिक्षिकेने एका अगळ्या-वेगळ्या पध्दतीने अभिवादन केले आहे.

मातीच्या कानावर आणि विश्वासाच्या प्रमाणावर राज्य करणारे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शनिवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी रात्री ९ ते पहाटे ४ वा. पर्यंत जागरण करून साडेचार बाय सात फुट लांबींची १५ ते १६ कलर वापरून आपल्या राहत्या घरामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य अशी रांगोळीमध्ये प्रतिमा साकारली असून त्यांनी सदरची रांगोळी पाहण्यासाठी काल दिवसभर आपले घर खुले केले होते.

श्रीमती आनंदी काळे या तांदुळवाडी केंद्रातील करांडेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये शिक्षिका आहेत.त्या सदरचा उपक्रम हा गेली दहा वर्षापासून अखंडीतपणे राबवत असून त्यांच्या या नावीन्यपूर्ण उपक्रमाला मा.सभापती संग्रामसिंह जहागीरदार,पिलीव येथील नामांकित डॉक्टर दिलीप पवार,तांदुळवाडी येथील केंद्रप्रमुख शैलेजा जाधव,जस्मिन सॉ मिलचे मालक इम्तियाज पठाण,शिक्षक,शिक्षिका यांसह पिलीव परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेट दिली.त्यांच्या या नयनरम्य अशा उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

आनंदी काळे यांचा ना कुठला एटीडी कोर्स झाला आहे.ना चित्रकला कोर्स ना पेंटिंग कोर्स तरीही माझ्या मनात रयतेच्या राजाची एक छबी उमटली आहे. आणि तीच छबी मी मनापासून रांगोळीच्या माध्यमातून सातत्यात उतरवली असल्याचे काळे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

भाजपच्या अश्विनी जगताप यांना विजयी करून विकासपुरूष लक्ष्मण जगताप यांना वाहा श्रद्धांजली!

रामदास आठवले यांचे आंबेडकरी जनतेला आवाहन

पिंपरी : प्रतिनिधी

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या पिंपरी-चिंचवडमधील सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. चिंचवडचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी रिपब्लिकन पक्षाला आणि पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना नेहमीच साथ दिली आहे. त्यांनी शहरात केलेल्या विकासाचा सर्व समाजाला फायदा झाला आहे. ते विकासपुरूष होते. त्यामुळे पोटनिवडणुकीत अश्विनी लक्ष्मण जगताप यांना मताधिक्याने विजयी करून दिवंगत लक्ष्मण जगताप यांना श्रद्धांजली वाहावी, असे आवाहन रामदास आठवले यांनी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व आंबेडकरी जनतेला केले.

पिंपरीमध्ये झालेल्या या बैठकीला भाजप, शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या महायुतीचे उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप, आरपीआयच्या राज्याच्या नेत्या व माजी नगरसेविका चंद्रकांता सोनकांबळे, बाळासाहेब भागवत, परशुराम वाडेकर, शहराध्यक्ष स्वप्निल कांबळे, कुणाल वाव्हळकर, ईलाबाई ठोसर, कमल कांबळे, सुधाकर वारभुवन, सम्राट जकाते, अंकुश कानडी, रमेश चिमूरकर, सिकंदर सूर्यवंशी, अजिज शेख, सुरेश निकाळजे, बाळासाहेब रोकडे, विनोद चांदमारे, सुजित कांबळे, रुक्मिणी पाटील, बाबा सरोदे, गौतम गायकवाड, श्रीमंत शिवशरण, संजय गायकवाड, अश्विन खुडे, बाळासाहेब शिंदे, दुर्गाप्पा देवकर, बाळासाहेब काकडे,

रेखा काणेकर, स्वप्नील कसबे, अविनाश शिरसाठ, भाजपचे प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप आदी उपस्थित होते.

चिंचवड पोटनिवडणुकीत रिपब्लिकन पक्षाकडून महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांचा जोरदार प्रचार सुरू आहे. त्याचा आढावा घेण्यासाठी स्वतः केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. रिपब्लिकन पक्ष ज्यांच्या पाठीशी उभा राहतो, तो उमेदवार शंभर टक्के विजयी होतो. त्यासाठी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पक्षासोबत जोडलेल्या गेलेल्या सर्व घटकांनी अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचारात कोणतीही कमतरता राहणार नाही याची काळजी घ्यावी.

दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप हे सर्व समाज घटकांना सोबत घेऊन जाणारे नेते होते. त्यांनी महापालिकेत सत्ता येताच मागासवर्गीय समाजातील दोन महिलांना स्थायी समितीचे अध्यक्ष केले होते. ते केवळ राजकारण करणारे नव्हते, तर समाजकारण करणारे नेते होते. त्यांनी रिपब्लिकन पक्षालाही नेहमीच मदत केली. दिवंगत लक्ष्मण जगताप यांनी या शहरात विकासात्मक राजकारण केले. शहरात झालेल्या विकासाचा फायदा सर्वच समाज घटकांना झाला आहे. आता त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळलेला असताना आपल्याकडून त्यांना मदत झाली पाहिजे. पोटनिवडणुकीत त्यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांना विजयी करून शेवटच्या श्वासापर्यंत प्रामाणिक आणि पक्षनिष्ठ राहिलेले दिवंगत लक्ष्मण जगताप यांना श्रद्धांजली वाहावी, असे आवाहन त्यांनी पदाधिकारी, कार्यकर्ते व आंबेडकरी जनतेला केले.

पुण्यातील ५ रुपयांचं तिकीट असलेली अटल सेवा बंद करण्याचा निर्णय

पुणे : प्रतिनिधी

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून (पीएमपी) उपनगर परिसरात ५६ मार्गावर पाच रुपयांमध्ये सुरू असलेली अटल सेवा (डेपो कोअर सिटी) तोट्यामुळे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याऐवजी आता सुरू असलेल्या २८ मार्गावर नियमित तिकीटदराप्रमाणे सेवा दिली जाणार आहेत. तर, जास्त तोट्यातील २८ मार्ग बंद करण्यात आले आहेत. ही सेवा बंद झाल्यामुळे प्रवाशांच्या खिशाला थोडीशी झळ बसणार आहे.

पीएमपीकडून शहर व उपनगर परिसरात २५ ऑक्टोंबर २०२० मध्ये पाच किलोमीटर अंतरासाठी पाच रूपये तिकीट अशी अटल सेवा सुरू करण्यात आली होती. त्यानंतर शहराच्या मध्य भागात दस मे बस ही पुण्यदशम बसची सेवा सुरू करण्यात आली. त्यामुळे शहराच्या मध्यवस्तीमधील अटल सेवा बंद करण्यात आली होती.

पण, उपनगर परिसरात असलेल्या डेपोपासून पाच ते सहा किलोमीटर अंतरावर जाणाऱ्यांसाठी ही पाच रुपये तिकीट असलेली अटक सेवा सुरू होती. या सेवेच्या ५६ मार्गावर १४३ फेऱ्या सुरू होत्या. पण, अटल सेवा सुरू असलेल्या बसचे काही मार्गावर प्रवासी व उत्पन्न कमी असल्याचे आढळून आले. त्यामुळे पीएमपी सध्या सुरू असलेल्या ५६ पैकी २८ मार्ग बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. तर, ज्या मार्गावर प्रवासी संख्या चांगली आहे. अशा २८ मार्गावर पीएमपीच्या ५१ फेऱ्या सुरू राहणार आहेत. पण, या बसला आता प्रवाशांना नियमित तिकीट दराप्रमाणे (टप्प्यानुसार) तिकीट द्यावे लागणार आहे.